महाराष्ट्र लोकसेवा आयोग

# महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा

गट 'अ' व 'ब' संयुक्त (पूर्व) परीक्षा

# मराठी

## व्याकरण, शब्दावली व आकलन

(गतवर्षीच्या प्रश्नपत्रिकांसह)

**Also useful for Maharashtra State Services Examination and various Junior Engineer Examinations**

MADE EASY Publications

**MADE EASY Publications**

Corporate Office: 44-A/4, Kalu Sarai (Near Hauz Khas Metro Station), New Delhi-110016
E-mail: infomep@madeeasy.in
Contact: 011-45124660, 08860378007
Visit us at: www.madeeasypublications.org

**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**
**महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा संयुक्त (पूर्व) परीक्षा, 2020**
**विषय : मराठी**

© Copyright, by MADE EASY Publications.
All rights are reserved. No part of this publication may be reproduced, stored in or introduced into a retrieval system, or transmitted in any form or by any means (electronic, mechanical, photo-copying, recording or otherwise), without the prior written permission of the above mentioned publisher of this book.

**प्रथम संस्करण : 2020**

MADE EASY PUBLICATIONS has taken due care in collecting the data and providing the solutions, before publishing this book. Inspite of this, if any inaccuracy or printing error occurs then MADE EASY PUBLICATIONS owes no responsibility. MADE EASY PUBLICATIONS will be grateful if you could point out any such error. Your suggestions will be appreciated.

© All rights reserved by MADE EASY PUBLICATIONS. No part of this book may be reproduced or utilized in any form without the written permission from the publisher.

# प्रस्तावना

महाराष्ट्र लोकसेवा आयोग दरवर्षी शासनातील अभियांत्रीकी सेवेच्या गट ‘अ’ व गट ‘ब’ च्या राजपत्रीत पदांच्या भरती साठी महाराष्ट्र अभियांत्रीकी सेवा परीक्षा घेतली जाते. या परीक्षेचे मुख्यत्वे तीन टप्पे आहेत. पूर्व परीक्षा, मुख्य परीक्षा व मुलाखत.

संपूर्ण प्रवेश प्रक्रीयेमध्ये पूर्व परीक्षेचे अनन्यसाधारण महत्व आहे. महाराष्ट्र राज्याचा संपूर्ण राज्यकारभार मराठीत चालत असल्यामुळे या परीक्षेत उत्तीर्ण होणाऱ्या उमेदवारास मराठी भाषेचे पूरेशे ज्ञान असणे आवश्यक आहे.

हे पुस्तक महाराष्ट्र अभियांत्रीकी सेवा संयुक्त (पूर्व) परीक्षेच्या मराठी विषयाचा अभ्यासक्रम लक्षात घेऊन बनवण्यात आले आहे. या पुस्तकात परीक्षेच्या अभ्यासक्रमाची अत्यंत मुद्देसूद व सोप्या भाषेत मांडणी केली आहे. या मध्ये व्याकरण, उतारे, वाक्प्रचार, समानार्थी व विरूद्धार्थी शब्द व मराठी भाषेतील म्हणी व त्यांचे अर्थ इ. बाबींचा समावेश केला आहे.

आम्हाला आशा व विश्वास आहे की हे पुस्तक विद्यार्थ्यांसाठी उपयोगी ठरेल व त्यांना योग्य दिशेने मार्गदर्शन करेल. या पुस्तकाची उपयोगीता वाढवीण्यासाठी आपल्या बहुमूल्य कल्पना (प्रस्ताव) आमंत्रीत आहेत.

# अनुक्रमणिका

# मराठी


**मराठी भाषेचा उगम ........ 1**

भाग अ **व्याकरण ........ 9**

**1. शब्दांच्या जाती** ........ 10

नाम ........ 11

सर्वनाम ........ 30

विशेषण ........ 35

क्रियापद ........ 42

क्रियाविशेषण अव्यय ........ 57

शब्दयोगी अव्यय ........ 65

उभयान्वयी अव्यय ........ 68

केवलप्रयोगी अव्यय ........ 75

**2. प्रयोग** ........ 78

**3. वाक्यांचे प्रकार** ........ 87

**4. समास** ........ 102

**5. अलंकार** ........ 110

**6. सिद्ध व साधित शब्द** ........ 115

भाग ब **उतारे ........ 125**

भाग क **वाक्प्रचार ........ 151**

भाग ड **विरुद्धार्थी शब्द ........ 174**

भाग इ **समानार्थी शब्द ........ 181**

भाग ई **मराठी भाषेतील म्हणी व त्यांचे अर्थ ........ 194**

**गतवर्षीच्या प्रश्नपत्रिकेतील ........ 213**

# मराठी भाषेचा उगम

मराठीभाषा ही इंडो–युरोपीय भाषाकुलातील एक भाषा आहे. मराठी भाषा 9 व्या शतकापासून प्रचलित असून, मराठी भाषेची निर्मिती संस्कृतपासून झालेल्या महाराष्ट्री, प्राकृत व अपभ्रंश या भाषांपासून झाली आहे. भारतातील प्रमुख 22 भाषांपैकी मराठी एक आहे. महाराष्ट्र आणि गोवा ह्या राज्यांची मराठी ही अधिकृत राजभाषा आहे. मराठी मातृभाषा असणाऱ्या लोकसंख्येनुसार मराठी ही जगातील दहावी व भारतातील तिसरी भाषा आहे. मराठी भाषा ही ज्ञानभाषा व्हावी यासाठी महाराष्ट्र शासनाकडून सातत्याने प्रयत्न होत आहेत. मराठी भाषेचा गौरव ज्ञानेश्वरांनी आपल्या साहित्यातून ही केलेला दिसून येतो. महाराष्ट्र हे मराठी भाषिकांचे राज्य म्हणून त्याला वेगळे महत्त्व प्राप्त झालेला आहे. तेराव्या शतकापासून ते आजतागायत मराठी भाषेतून अनेक श्रेष्ठ साहित्यकृती निर्माण झालेल्या आहेत आणि त्यात सातत्यपूर्ण रीतीने भर पडत आहे. 2011 च्या जनगणनेनुसार, भारत देशात मराठी भाषकांची एकूण लोकसंख्या सुमारे 9 कोटी आहे.

## मराठी भाषिक प्रदेश

मराठी भाषा मुख्यत्वे भारतातील महाराष्ट्र राज्यात बोलली जाते. त्याचबरोबर गोवा, उत्तर कर्नाटक (बेळगांव, हुबळी–धारवाड, गुलबर्गा, बिदर, कारवार), गुजरात (दक्षिण गुजरात, सूरत, बडोदा व अहमदाबाद), आंध्रप्रदेश (हैदराबाद), मध्यप्रदेश (इंदूर, ग्वाल्हेर), तामिळनाडू (तंजावर) व छत्तीसगढ राज्यांत आणि दमण आणि दीव, दादरा नगर हवेली या केंद्रशासित प्रदेशांतील काही भागातही मराठी बोलली जाते. देशातील 36 राज्ये आणि 72 देशांमध्ये मराठी भाषिकांची वस्ती आहे. इतरही अनेक देशांमध्ये मराठी भाषा बोलण्याचे वाढत आहे.

मराठी भाषा भारतासह मॉरिशस व इज़रायल या देशांतही बोलली जाते. त्याचबरोबर जगभरात विखुरलेल्या मराठी–भाषकांमुळे मराठी अमेरिकेची संयुक्त संस्थाने, संयुक्त अरब अमिरात, दक्षिण आफ्रिका, पाकिस्तान, सिंगापूर, जर्मनी, युनायटेड किंगडम, ऑस्ट्रेलिया व न्यूझीलंड येथेही बोलली जाते.

### राजभाषा

भारतीय राज्यघटनेतील 22 अधिकृत भाषांच्या यादीत मराठीचा समावेश आहे. मराठी ही महाराष्ट्र राज्याची एकमेव अधिकृत राजभाषा आहे. गोवा राज्यात कायद्यानुसार कोकणी ही राजभाषा असली तरी मराठीचा वापर शासनाच्या सर्व कारणासाठी होऊ शकतो. शासनाशी मराठीत होणाऱ्या पत्रव्यवहाराचे उत्तर मराठीतच दिले जाते. दादरा व नगर हवेली या केंद्रशासित प्रदेशात मराठी एक अधिकृत राजभाषा आहे.

महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठांत मराठीच्या उच्च शिक्षणाची सोय आहे तसेच महाराष्ट्राबाहेरील गोवा विद्यापीठ (पणजी), महाराजा सयाजीराव विद्यापीठ (बडोदे), उस्मानिया विद्यापीठ (तेलंगण), गुलबर्गा विद्यापीठ, देवी अहिल्या विद्यापीठ (इंदूर) व जवाहरलाल नेहरू विश्वविद्यालय (नवी दिल्ली) येथे मराठी उच्चशिक्षण विभाग आहेत. महाराष्ट्राबाहेरील एकूण 15 विद्यापीठांमध्ये मराठी शिकविली जाते.

## मराठी भाषा दिवस

विष्णू वामन शिरवाडकर (27 फेब्रुवारी, 1912–10 मार्च 1999) हे मराठी भाषेतील ज्ञानपीठ पुरस्कारविजेते अग्रगण्य कवी, लेखक, नाटककार कथाकार व समीक्षक होते. त्यांनी कुसुमाग्रह या टोपणनावाने कवितालेखन केले. त्यांचा जन्म दिवस (27 फेब्रुवारी) मराठी भाषा दिवस म्हणून साजरा केला जातो.

## मराठी साहित्य संमेलन

11 मे 1875 रोजी सायंकाळी पुण्याच्या हिराबागेत मराठी ग्रंथकारांचे पहिले संमेलन भरले. याला पहिले अखिल भारतीय

मराठी साहित्य संमेलन समजले जाते. या संमेलनाचे अध्यक्षपद न्या. रानडे यांनी भूषविले.

## मराठी पुस्तके

'लीळाचरित्र' हा महान ग्रंथ म्हाइंभटांनी लिहून मराठी भाषेचा पाया रोवला. मराठी भाषेत आजवर विविध विषयांवर विस्तृत लेखन प्रकाशीत झाले असून, त्यातील कैक प्रकाशने जागतिक साहित्यात मानाचे स्थान मिळवू शकतील अशी आहेत. मराठीत दरवर्षी दोन हजार नवीन पुस्तके प्रकाशित होतात व सुमारे 500 दिवाळी अंक प्रसिद्ध होतात. नामवंत खासगी प्रकाशन संस्था आणि सरकारी प्रकाशने यांची वार्षिक उलाढाल, तसेच पाठ्यपुस्तके धार्मिक, ललित आणि वैचारिक ग्रंथ यांची एकत्रित बाजारपेठ सुमारे 250 कोटी रुपयांपर्यंत आहे. सरकारी संस्था 'बालभारती' दरवर्षी सुमारे 9 कोटी पुस्तके छापते. भारतातील सर्वाधिक खपाचे मासिक 'लोकराज्य' हे, आणि देशातले सर्वाधिक खपाचे चौथ्या क्रमांकाचे वर्तमानपत्र 'लोकमत' हे आहे. देशभरातील एकूण ग्रंथालयांतली 25 टक्के ग्रंथालये एकट्या महाराष्ट्रात आहेत.

शब्दार्थ कोशांव्यतिरिक्त मराठी भाषेत, चरित्र कोश, तत्त्वज्ञानकोश, वाङ्मय कोश, विश्वकोश, समाजविज्ञान कोश, सरिता कोश, संस्कृती कोश, ज्ञानकोश, असे अनेक प्रकारचे कोश मराठीत आहेत. या बाबतीत मराठी भाषेचा जगात दुसरा क्रमांक लागतो.

## पुरस्कार

- विंदा करंदीकर, कुसुमाग्रज, वि.स. खांडेकर आणि भालचंद्र नेमाडे अशा चार मराठी साहित्यिकांना आजवर ज्ञानपीठ मिळाले आहेत.
- 'मूर्तिदेवी पुरस्कार' शिवाजी सावंत यांना मृत्युंजय या कादंबरीसाठी मिळाला आहे.
- महेश एलकुंचवार आणि विजय तेंडुलकर या लेखकांना 'सरस्वती सन्मान' मिळाले आहेत.
- विंदा करंदीकर आणि नारायण सुर्वे यांना 'कालिदास सन्मान' मिळाले आहेत.
- महाराष्ट्रातले दादासाहेब फाळके यांचा नावाने 'अखिल भारतीय कला सन्मान' दिला जातो.
- भारतीय संगीत नाटक अकादमीचे पुरस्कार आजवर बालगंधर्वना मिळाले आहेत.
- सर्वोत्तम चित्रपटाचे पहिले राष्ट्रपती सुवर्णकमळ आचार्य अत्रे यांच्या ''श्यामची आई'' चित्रपटास मिळाले होते.
- डॉ. बाबासाहेब आंबेडकर, धोंडो केशव कर्वे, पां.वा. काणे, भीमसेन जोशी, जे.आर.डी. टाटा, सचिन तेंडुलकर, विनोबा भावे आणि लता मंगेशकर हे आजवरचे भारतरत्न पुरस्कार मिळविणारे महाराष्ट्रीय.
- भालचंद्र नेमाडे यांच्या हिंदू एक जगण्याची समृद्ध अडगळ या कादंबरीला ज्ञानपीठ पुरस्कार मिळाला आहे.

## मराठी भाषेचा इतिहास

मराठी भाषेचा उदय संस्कृतचा प्रभावाखाली निर्माण झालेल्या प्राकृत भाषेचा महाराष्ट्री या बोलीभाषेपासून झाला, असे बहुतांशी मानले जाते. पैठण (प्रतिष्ठान) येथील सातवाहन साम्राज्याने महाराष्ट्री भाषेचा प्रशासनात वापर सर्वप्रथम केला. देवगिरीच्या यादवांच्या काळात मराठी भाषा व संस्कृतीची भरभराट झाली. मराठी ही भाषा देवनागरी लिपी वापरून लिहिली जाते. इ.स. 1278 मध्ये म्हाइंभट यांनी लीळा चरित्र लिहिले. त्यानंतर इ.स. 1290 मध्ये ज्ञानेश्वरी या ग्रंथाची रचना ज्ञानेश्वरांनी केली. महानुभाव संप्रदायाने मराठी साहित्यात मौलिक भर घातली. संत एकनाथ यांनी या भाषेत भारुडे लिहिली आणि एकनाथी भागवत, भावार्थ रामायण आदि ग्रंथांची भर घातली.

छत्रपती शिवाजी महाराजांनी मराठी साम्राज्याची मुहूर्तमेढ रोवली आणि पेशव्यांनी या साम्राज्याचा विस्तार केला. त्यानंतर मराठी भाषेस राजाश्रय मिळाला. इ.स. 1947 नंतर स्वतंत्र भारत देशाने मराठीला अधिकृत राज्यभाषेचा दर्जा दिला. इ.स. 1960 मध्ये मराठी भाषिकांच्या एकसंध महाराष्ट्र राज्यास मान्यता मिळाली आणि मराठीस राजभाषेचा मुकुट प्राप्त झाला.

राजा केसिदेवरायज्या कारकिर्दीत कोरलेला अक्षी शिलालेख हा आजवर सापडलेला मराठी भाषेतील पुराणतन शिलालेख आहे. अक्षी शिलालेखाच्या शोधापूर्वी कर्नाटकातील श्रवणबेळगोळ येथील गोमटेश्वराच्या उंच मूर्तीच्या पायाशी मराठीत

# अनुभाग

# अ

# व्याकरण


# 1 शब्दांच्या जाती

तोंडावाटे निघणाया मूलध्वनींना आपण कागदावर लिहून दाखविताना वापरण्यात येणाऱ्या विशिष्ट चिन्हांना आपण 'अक्षरे' असे म्हणतो. क, म, ळ ही तीन अक्षरे आहेत. ही अक्षरे विशिष्ट क्रमाने आल्यामुळे, 'कमळ' हा शब्द तयार झाला व त्या अक्षरांना अर्थ प्राप्त झाला आहे. शब्दांना प्रत्यय जोडून वाक्यात वापरल्यास त्यांना पद असे म्हणतात व्याकरणात शब्दाच्या मूळ रूपाला प्रकृती असे म्हणतात; तर त्यास प्रत्यय जोडून बदल केल्यास विकृती म्हणतात.

**उदाहरण :** शब्द – राजा, पद – राजाने

वरील उदाहरणात 'राजा' हा मूल शब्द म्हणजेच प्रकृती आहे आणि प्रकृतीला 'ने' हा प्रत्यय लागून 'राजाने' हे रूप तयार होते, त्यास विकृती असे म्हणतात.

एखाद्या शब्दसमूहाला पूर्ण अर्थ प्राप्त झाल्यानंतर त्यास 'वाक्य' असे म्हटले जाते.




एखाद्या शब्दसमूहाला पूर्ण अर्थ प्राप्त झाल्यानंतर त्यास 'वाक्य' असे म्हटले जाते. 'रामा आंबा खातो' हे वाक्य आहे. या वाक्यात तीन पदे अहेत. व्याकरणात पदांनासुध्दा स्थूलमानाने 'शब्द' असेच म्हटले जाते. 'राणीने' हे पद आहे. यातील मूळ शब्द 'राणी' हा आहे. व्याकरणात मूळ शब्दाला 'प्रकृती' असे म्हणतात. शब्दाच्या मूळ रूपाला म्हणजेच प्रकृतीला 'ने' हा प्रत्यय लागून 'राणीने' हे रूप तयार होते त्यास 'विकृती' असे म्हणतात. शब्दाच्या मूळ रूपाचे बदललेले रूप म्हणजेच 'विकृती' होय. कोणतेही वाक्य शब्दांचे बनलेले असते. प्रत्येक वाक्यात शब्दांची वेगवेगळी कार्ये असतात. शब्दांच्या कार्यावरून त्यांना वेगवेगळी नावे देण्यात आलेली आहेत.

- **नाम :** वाक्यातील शब्दांपैकी जो शब्द वस्तूचे किंवा त्यांच्या गुणाचे नाव असते त्या शब्दास 'नाम' असे म्हणतात. उदा. रमेश, फूल.
- **सर्वनाम :** सर्व प्रकारच्या नामांऐवजी वापरल्या जाणाऱ्या शब्दास 'सर्वनाम' असे म्हणतात. उदा. मी, तू, हा, जो, कोण.
- **विशेषण :** नामांबद्दल विशेष माहिती सांगून त्यांचे क्षेत्र मर्यादित करतात, त्यांना विशेषण असे म्हणतात. उदा. गोड, कडू, खारट इत्यादी.
- **क्रियापद :** वाक्यातील क्रिया दाखवून त्याचा अर्थ पूर्ण करणाऱ्या शब्दास क्रियापद असे म्हणतात. उदा. उठतो, बसतो, जातो, जाईल, आहे इत्यादी.

- **क्रियाविशेषण :** क्रियापदबद्दल विशेष माहिती सांगणाऱ्या शब्दाला क्रियाविशेषण असे म्हणतात. उदा. आज, काल, फार, जलद, पटकन, चमचम इत्यादी.
- **शब्दयोगी :** नामांना किंवा सर्वनामांना जोडून येऊन वाक्यातील शब्दांचा संबंध दाखविणाऱ्या शब्दाला 'शब्दयोगी' असे म्हणतात. उदा. त्याच्यासाठी, झाडाखाली, झाडावर, टेबलावर, ढगामागे इत्यादी.
- **उभयान्वयी :** दोन शब्द किंवा वाक्यांना जोडून येणाऱ्या शब्दास 'उभयान्वयी' असे म्हणतात. उदा. परंतु, आणि, व, किंवा, म्हणून, शिवाय, पण, की इत्यादि.
- **केवलप्रयोगी :** मनातील भावना व्यक्त करणाऱ्या शब्दास 'केवलप्रयोगी' असे म्हणतात. उदा. अबब, अरेरे, शाबास, बापरे, वावा, ओहो, अहाहा, शी, आई ग, इश्श, थुः इत्यादी.

नाम, सर्वनाम, विशेषण, क्रियापद, क्रियाविशेषण, शब्दयोगी, उभयान्वयी व केवलप्रयोगी हे शब्दांचे आठ प्रकार आहेत. या प्रकारांनाच शब्दांच्या जाती असे म्हणतात.


एकच शब्द विविध वाक्यांत विविध कार्ये करताना दिसून येतो. पुढे दिलेल्या चार वाक्यांत **वर** या शब्दाचे विविध कार्य लक्षात घ्या.

1. दशरथ राजाने कैकयीला दोन **वर** दिले. : या वाक्यात **वर** हा शब्द नाम आहे.
2. तू राजपुत्राला **वर**. : या वाक्यात **वर** हा शब्द क्रियापद आहे.
3. पोपट झाडा**वर** बसला. : या वाक्यात **वर** हा शब्द 'शब्दयोगी' आहे.
4. फलंदाजाने मारलेला चेंडू **वर** गेला. : या वाक्यात **वर** हा शब्द क्रियाविशेषण आहे.

शब्दांच्या आठ जातीपैकी नाम, सर्वनाम, विशेषण व क्रियापद या चार जातींमध्ये लिंग, वचन यांमुळे बदल होतो म्हणून यांना 'विकारी' असे म्हणतात. 'विकारी'ला 'सव्यय' असेही म्हणतात. क्रियाविशेषण, शब्दयोगी, उभयान्वयी व केवलप्रयोगी या चार जातींत लिंग, वचन व विभक्ती यांच्यामुळे बदल होत नाही. म्हणून यांना 'अविकारी' असे म्हणतात. 'अविकारी' ला अव्यय असेही म्हणतात.

## नाम

कोणत्याही प्रत्यक्षात असणाऱ्या किंवा काल्पनिक वस्तूला दिलेले नाव म्हणजेच नाम होय. उदा. पेन, टेबल, चेंडू, पुस्तक, कागद, सुरेश, सविता, अप्सरा, स्वर्ग इत्यादि. सामान्यनाम, विशेषनाम व भाववाचक नाम हे तीन नामांचे मुख्य प्रकार आहेत.





### 1. सामान्यनाम

एकाच जातीच्या पदार्थात असलेल्या समान गुणधर्मामुळे त्या वस्तूला जे सर्वसामान्य नाव दिले जाते त्याला सामान्यनाम असे म्हणतात. वस्तूच्या जातीला दिलेले नाव म्हणजेच सामान्यनाम होय. उदा. पर्वत, नदी, घर, वर्ग, कापड, कळप, लेखणी, समुद्र, प्राणी, झाड इत्यादी.

# विशेषण

जो शब्द नामाबद्दल विशेष माहिती सांगून नामाची व्याप्ती मर्यादित करतो, त्या विकारी शब्दास 'विशेषण' असे म्हणतात. **चांगला** मुलगा, **पांढरी** गाय, **सुंदर** मुलगी, **कोवळे** पान. चांगला, पांढरी, सुंदर, कोवळे हे शब्द त्यांच्यापुढे असणाऱ्या नामांबद्दल विशेष माहिती सांगतात म्हणून ही 'विशेषणे' आहेत.

ज्या नामाबद्दल 'विशेषण' विशेष अशी माहिती सांगते त्या नामाला विशेष्य असे म्हणतात. चांगला मुलगा, पांढरी गाय, सुंदर मुलगी, कोवळे पान या शब्दसमूहांतील मुलगा, गाय, मुलगी, पान ही विशेष्ये आहेत.




## अ. गुणविशेषण

नामाचा कोणताही गुण किंवा विशेष माहिती दाखविणाऱ्या विशेषणास 'गुणविशेषण' असे म्हणतात. गुणविशेषण नेहमी नामाच्या अगोदर येते. उदा. **पिकलेला** आंबा, **हुशार** मुलगा, **मंजूळ** आवाज, **मोठी** माणसे, **वक्र** नलिका, **गरीब** रामू, **पिवळे** कापड इत्यादी.

## ब. संख्याविशेषण

जे विशेषण नामाची संख्या दाखविते, त्या विशेषणास 'संख्याविशेषण' असे म्हणतात. संख्याविशेषणाचे पुढीलप्रमाणे पाच प्रकार आहेत. (1) गणनावाचक (2) क्रमवाचक (3) आवृत्तिवाचक (4) पृथकत्ववाचक आणि (5) अनिश्चित.

1. **गणनावाचक विशेषण :** ज्या विशेषणाचा उपयोग गणती करण्यासाठी किंवा मोजण्यासाठी होतो, त्या विशेषणास 'गणनावाचक' संख्याविशेषण' असे म्हणतात. उदा. **साठ** रुपये, **चौदा** भाषा, **छत्तीस** गुण इत्यादी.

   वरील शब्दांमध्ये साठ, चौदा, या विशेषणांचा उपयोग केवळ गणना करण्यासाठी होतो. म्हणून या विशेषणांना 'गणनावाचक संख्याविशेषणे' असे म्हणतात. गणनावाचक विशेषणांचे पूर्णांकवाचक, अपूर्णांकवाचक आणि साकल्यवाचक असे तीन प्रकार पडतात.

- **पूर्णांकवाचक :** पूर्ण अंकात गणना होणाऱ्या विशेषणास 'पूर्णांकवाचक विशेषण' असे म्हणतात. उदा. **दहा** मुली, **शंभर** रुपये.
- **अपूर्णांकवाचक :** अपूर्णांकात गणना होणाऱ्या विशेषणास 'अपूर्णांकवाचक विशेषण' असे म्हणतात. उदा. **पाव** किलो साखर, **अर्धा** कप चहा.
- **साकल्यवाचक :** ज्या विशेषणाने असलेल्या वस्तूंपैकी सर्वांचा बोध होतो, त्या विशेषणास 'साकल्यवाचक विशेषण' असे म्हणतात. उदा. दोघे, तुम्ही पंधराही, उभयता.

2. **क्रमवाचक विशेषण :** जी विशेषणे वस्तूंचा क्रम दाखवितात तया विशेषणास 'क्रमवाचक विशेषण' असे म्हणतात. उदा. **तिसरा** मजला, **चौथा** खांब, **पाचवा** बंगला, इत्यादी.
3. **आवृत्तिवाचक विशेषण :** किती वेळा आवृत्ती झाली याचा बोध दाखविणाऱ्या विशेषणास 'आवृत्तिवाचक विशेषण' असे म्हणतात. उदा. **द्विगुणित** आनंद, **दहावी** आवृत्ती, **वीसपट** मते इत्यादी.
4. **पृथकत्ववाचक विशेषण :** वेगवेगळेपणाचा बोध करून देणाऱ्या विशेषणास 'पृथकत्ववाचक विशेषण' असे म्हणतात. उदा. **एकेक** मुलगा, **पाचपाचचा** गट, **दहादहाची** तुकडी इत्यादी.
5. **अनिश्चित विशेषण :** ज्या विशेषणाने निश्चित संख्येचा बोध होत नाही, त्या विशेषणास 'अनिश्चित विशेषण' असे म्हणतात. उदा. **सर्व** पक्षी, **काही** मुले, **काही** गावकरी, **थोडे** गहू, **इतर** लोक, इत्यादी.

## क. सार्वनामिक विशेषण

सर्वनामापासून तयार होऊन नामांबद्दल विशेष माहिती सांगणाऱ्या विशेषणास 'सार्वनामिक विशेषण' किंवा 'सर्वनामसाधित विशेषण' असे म्हणतात. उदा. **तो** पक्षी गातो आहे, **हा** मनुष्य धावत आहे.

वरील वाक्यांतील तो, हा, ही मूळची सर्वनामे आहेत. सर्वनाम ऐ नामाऐवजी येते. मात्र वरील उदाहरणांत सर्वनामांच्यापुढे नामे आली आहेत. या वाक्यांमध्ये ती सर्वनामे राहिली नसून ती नामांबद्दल विशेष माहिती सांगतात म्हणून त्यांना 'सार्वनामिक' किंवा 'सर्वनामसाधित' विशेषणे असे म्हणतात. मी, तू, तो, हा, जो, कोण, काय, आम्ही, तुम्ही ही मूळची सर्वनामे जेव्हा सार्वनामिक विशेषणे म्हणून येतात तेव्हा त्यांच्या रूपात पुढीलप्रमाणे बदल होतो.

**इतर शब्दांचा विशेषणाप्रमाणे उपयोग :**

1. **नामासाधित विशेषणे :** एखाद्या नामाबद्दल अधिक माहिती सांगण्यासाठी जेव्हा दुसऱ्या एखाद्या नामाचाच वापर केला जातो. तेव्हा त्यास **'नामसाधित विशेषण'** म्हणतात.

   1. माझ्या भावाचे <u>कापड</u> दुकान आहे.
   2. मला <u>सातारी</u> पेढे आवडतात.

2. **धातुसाधित विशेषणे :** क्रियापदातील मूळ शब्दाला धातू असे म्हणतात. धातूंना प्रत्यय जोडून त्यांचा नामापूर्वी विशेषणासारखा उपयोग केला जातो.

   **उदा.** <u>पिकलेला</u> आंबा, <u>पेटती</u> ज्योत, <u>बोलकी</u> बाहुली.

   वरील विशेषणात पीक, पेट, बोल हे धातू आहेत.

3. **अव्ययसाधित विशेषणे :** 'वर, खाली, मागे, पुढे' या मूळ अव्ययांना प्रत्यय जोडून त्यांचा विशेषणाप्रमाणे उपयोग केला जातो.

   **उदा.** <u>वरचा</u> मजला, <u>खालचे</u> पुस्तक, <u>मागील</u> मोटार, <u>पुढची</u> गल्ली.

4. **परिमाणवाचक विशेषणे :** संख्येत न मोजता येणाऱ्या नामांपूर्वी वापरलेल्या प्रमाणदर्शक शब्दांना परिमाणवाचक विशेषण म्हणतात.

**उदा.** काही साखर, थोडे पाणी

5. **समासघटित विशेषणे :** सामासिक शब्दांचा सुद्धा विशेषणाप्रमाणे वापर केला जातो. त्याला समासघटित विशेषणे म्हणतात.

**उदा.** पंचमुखी हनुमान, एकवचनी राम, नवरात्र महोत्सव.

## नमूना प्रश्न

1. पुढील वाक्ये पाहा.

(1) मी आज **साखर**–काकडी खाल्ली.

(2) रामाला **फळ**–भाजी फार आवडते.

वरील वाक्यांतील 'साखर, फळ' ही मूळची नामे आहेत. पण वरील वाक्यांत ती त्यांच्यापुढे आलेल्या नामांबद्दल अधिक माहिती सांगतात; म्हणजे ती विशेषणांची कार्ये करतात. अशा प्रकारचे विशेषणे व विशेष्य मिळून सामासिक शब्द तयार होतो.

2. पुढील शब्द पाहा.

**रांगणारे** मूल, **हसरी** मुलगी, **बोलकी** बाहुली

वरील शब्दांतील 'रांगणारे, हसरी, बोलकी' हे शब्द त्यांच्यापुढे क्रमाने येणाऱ्या नामांची विशेषणे आहेत. पण ही विशेषणे, रांग, हस, बोल या धातूंपासून बनलेली आहेत. अशा विशेषणांना **'धातुसाधित विशेषणे'** असे म्हणतात.

3. पुढील शब्द पाहा.

**खालची** माडी, **मागील** दार

वरील शब्दांतील 'खालची, मागील' हे शब्द त्यांच्यापुढे आलेल्या 'माडी, दार' या नामांची विशेषणे आहेत. पण ही विशेषणे 'खाली, मागे' या अव्ययांपासून तयार झालेली आहेत. म्हणून त्यांना **'अव्ययसाधित विशेषणे'** असे म्हणतात. वर, खाली, मागे, पुढे या मूळ अव्ययांना 'चा, ब, ई, ल' हे प्रत्यय लागून ही विशेषणे झालेली आहेत.

4. (1) गणेशचे अक्षर **सुंदर** आहे.

(2) आजी पूजा **चांगली** झाली.

वरील वाक्यांतील 'सुंदर' हे विशेषण 'अक्षर' या नामाबद्दल अधिक माहिती सांगते व नामानंतर आले आहे. 'चांगली' हे विशेषण 'पूजा' या नामाबद्दल अधिक माहिती सांगते व ते नामानंतर आले आहे. 'सुंदर, चांगले' विधिविशेषणे आहेत.

नामापूर्वी येणाऱ्या विशेषणाला अधिविशेषण म्हणतात तर नामानंतर येणाऱ्या विशेषणाला विधिविशेषण असे म्हणतात.

5. (1) नामसदृश विशेषण – (1) श्रीमंत माणसांना गर्व असतो. (विशेषण)
(2) श्रीमंतांना गर्व असतो. (नाम)

(2) दर्शक विशेषण – ही मुलगी चलाख आहे.

(3) संबंधी विशेषण – जो मुलगा व्यायाम करतो, तो सशक्त होतो.

(4) प्रश्नार्थक विशेषण – कोण मनुष्य येऊन गेला?
त्याने काय पदार्थ आणले?

(5) सार्वनामिक विशेषण – आम्हां मुलांना कोण विचारतो?

## सराव प्रश्न

1. हा चौपदरी रस्ता आहे. अधोरेखित शब्दाची जात ओळखा.
   (1) भावाचक नाम (2) विशेषण
   (3) विशेष नाम (4) सामान्य नाम
2. रिकाम्या जागी योग्य शब्द निवडा. 'पुरामुळे लोकांचे ––––– नुकसान झाले.'
   (1) आवर्जून (2) अपरिमित
   (3) अफाट (4) असंख्य
3. खालील शब्दांतील गुणविशेषण कोणते.
   (1) कडू कारले (2) दहा लिटर दूध
   (3) अर्धा मीटर कापड (4) पुष्कळ धान्य
4. खालील शब्दांतील धातुसाधित विशेषण कोणते?
   (1) स्वप्नाळू मुलगा (2) लबाड कोल्हा
   (3) निरोगी मूल (4) पडका किल्ला
5. गोपीचा धावण्यात दुसरा क्रमांक आला. या वाक्यातील संख्या विशेषणाच प्रकार कोणता.
   (1) आवृत्तिवाचक (2) अनिश्चित
   (3) क्रमवाचक (4) गणनावाचक
6. आम्ही पाची भावंडे औरंगाबादेत शिकलो. या वाक्यातील संख्या विशेषणाच प्रकार कोणता.
   (1) साकल्यवाचक (2) पृथकत्ववाचक
   (3) क्रमवाचक (4) आवृत्तिवाचक
7. धातुसाधित विशेषण कोणते?
   (1) पडकी माडी (2) उंच इमारत
   (3) चौथी भिंत (4) पुढचे घर
8. अव्ययसाधित विशेषणाचे उदाहरण कोणते?
   (1) दुमजली घर (2) मधले घर
   (3) राबते घर (4) आमचे घर
9. नामसाधित विशेषणाचे उदाहरण कोणते?
   (1) आकर्षक खेळणी (2) तिची खेळणी
   (3) लाकडी खेळणी (4) मोडकी खेळणी
10. 'असला नवरा नको ग बाई!' या वाक्यातील 'असला' हा शब्द कोणत्या विशेषण प्रकारातील आहे.
   (1) गुण विशेषण (2) दर्शक विशेषण
   (3) सार्वनामिक विशेषण (4) अनिश्चित विशेषण
11. पुढील शब्दांतील विशेषण कोणते?
   (1) सदाचारी (2) संकट
   (3) साहस (4) प्रभाव
12. पाच हजार यातील पाच कोणते विशेषण आहे?
   (1) धातुसाधित (2) संख्यावाचक
   (3) गुणवाचक (4) सार्वनामिक

# क्रियापद

'क्रियापद' या शब्दातील 'क्रिया' याचा अर्थ एखादी 'कृती' आणि 'पद' याचा अर्थ 'शब्द' असा होतो. वाक्यातील ज्या शब्दावरून क्रिया कळते त्या शब्दाला 'क्रियापद' असे म्हणतात. ''वाक्यातील क्रिया स्पष्ट करून वाक्याचा अर्थ पूर्ण करणाऱ्या शब्दास 'क्रियापद असे म्हणतात.''

'क्रियापद' हा वाक्यातील प्रमुख शब्द असतो. वाक्याचा अर्थ पूर्ण होण्यासाठी क्रियापदाची आवश्यकता असते. वाक्यात क्रियापदाने दाखविलेली क्रिया करणाऱ्यास 'कर्ता' असे म्हणतात. वाक्यातील 'कर्ता' व 'कर्म' शोधून काढण्यासाठी क्रियापदाचा मूळ धातू शोधून काढावा आणि त्या मूळ धातूला 'णारा' हा प्रत्यय लावून 'कोण'? हा प्रश्न केल्यास वाक्यातील 'कर्ता' मिळतो.

उदा. रामा आंबा खातो.

या वाक्यात 'खातो' हे क्रियापद आहे. 'खा' हा धातू आहे. 'खा' या धतूला 'णारा' हा प्रत्यय लावल्यास कर्ता मिळतो. खाणारा कोण? या प्रश्नाचे उत्तर 'रामा' म्हणून या वाक्यात 'रामा' हा कर्ता आहे. वाक्यातील 'कर्म' शोधण्यासाठी मुख्य क्रियापदाने दाखविलेली क्रिया 'कोणावर घडते?' असा प्रश्न केल्यास त्या वाक्यातील 'कर्म' मिळते. वरील वाक्यात खाण्याची क्रिया कोणावर घडते? – खाण्याची क्रिया आंब्यावर घडते म्हणून 'आंबा' हे कर्म आहे.

उदा. गायीने गवत खाल्ले.

या वाक्यात 'खाल्ले' हे क्रियापद आहे. खाणारी कोण? – गाय – म्हणून 'गायीने' हा 'कर्ता' आहे. खाण्याची क्रिया कोणावर घडते? – गवतावर म्हणून गवत हे 'कर्म' आहे.

उदा. मला तूप आवडते.

या वाक्यात 'आवडते' हे क्रियापद आहे. आवडणारे काय? आवडणारे 'तूप' म्हणून या वाक्यात 'तूप' हा 'कर्ता' आहे. (मला हा कर्ता नाही).

## क्रियापदांचे प्रकार

1. **सकर्मक क्रियापद :** ज्या क्रियापदाचा अर्थ पूर्ण होण्यासाठी 'कर्माची' गरज असते त्या क्रियापदास 'सकर्मक क्रियापद' असे म्हणतात.

   उदा. मी पुस्तक वाचतो.

   या वाक्यात 'वाचतो' हे क्रियापद आहे. वाचणारा कोण? असा प्रश्न केल्यास 'मी' हे उत्तर मिळते. म्हणून 'मी' हा कर्ता आहे. वाचण्याची क्रिया कोणावर घडते? – पुस्तकावर म्हणून 'पुस्तक' हे 'कर्म' आहे. म्हणून 'वाचतो' हे क्रियापद सकर्मक आहे.

   उदा. रामाने बैलाला मारले.

   या वाक्यात 'मारले' हे क्रियापद आहे. 'मारणारा कोण?' असा प्रश्न केल्यास 'रामाने' हे उत्तर मिळते. म्हणून 'रामाने' हा 'कर्ता' आहे. 'मारण्याची क्रिया कोणावर घडते?' असा प्रश्न केल्यास 'बैलावर' हे उत्तर मिळते. 'बैलाला' हे कर्म आहे. म्हणून मारले हे सकर्मक क्रियापद आहे.

2. **अकर्मक क्रियापद :** ज्या क्रियापदाचा अर्थ पूर्ण होण्यासाठी कर्माची आवश्यकता नसते त्या क्रियापदास 'अकर्मक क्रियापद' असे म्हणतात. 'अकर्मक क्रियापदामध्ये कर्त्यापासून निघालेली क्रिया कर्त्याशीच थांबते किंवा कर्त्याच्या ठिकाणीच लय पावते'.

   उदा. 1. दिव्या गाते. 2. मी हसतो.

   या वाक्यांत गाते, हसतो, ही क्रियापदे आहेत. या क्रियापदांचा अर्थ पूर्ण होण्यासाठी कर्माची आवश्यकता नाही. म्हणून ही क्रियापदे 'अकर्मक' आहेत.

3. **द्विकर्मक क्रियापद :** ज्या वाक्यातील क्रिया कर्त्याकडून एकाच वेळी दोन घटाकंवर घडते अशा क्रियापदास **द्विकर्मक क्रियापद** असे म्हणतात.

   1. मुलीने **राजाला पिशवी** दिली.
   2. गुरुजींनी **विद्यार्थ्यांना गणित** शिकवले.
   3. आजीने **नातीला गोष्ट** सांगितली.

   **अशा प्रकारे एकाच वाक्यात दोन कर्मे असतील तर त्यांचे खालीलप्रमाणे दोन प्रकार पडतात.**

   (अ) **प्रत्यक्ष कर्म :** वस्तुवाचक (दान जाणारे) कर्माला प्रत्यक्ष कर्म असे म्हणतात.
   उदा. गणित, पिशवी, गोष्ट

   (ब) **अप्रत्यक्ष कर्म :** व्यक्तिवाचक कर्मांना (दान घेणारे) अप्रत्यक्ष कर्म म्हणतात. त्यांना सामान्यपणे 'स, ला, ना, ते' प्रत्यय असतात व विभक्ती चतुर्थी असते.

4. **विधानपूरक क्रियापद :** ज्या क्रियापदास वाक्याचा अर्थ पूर्ण करण्यसाठी 'पूरक' शब्दाची गरज असते त्या क्रियापदास 'विधानपूरक क्रियापद' असे म्हणतात. सकर्मक क्रियापदास वाक्याचा अर्थ पूर्ण होण्यासाठी कर्माची आवश्यकता असते, तर अकर्मक क्रियापदांना कर्माची आवश्यकता नसते. केवळ कर्ता व क्रियापदाने वाक्याला पूर्ण अर्थ प्राप्त होतो. परंतु काही अकर्मक धातू असे असतात की, कर्ता व क्रियापद असूनही वाक्याचा अर्थ पूर्ण होत नाही, वाक्याचा अर्थ पूर्ण होण्यासाठी 'पूरक' शब्दाची आवश्यकता असते.

   उदा.

   1. अनिल हुशार आहे.
   2. दूध नासके निघाले.

   वरील वाक्यांत आहे, निघाले ही क्रियापदे आहेत. या वाक्यांत हुशार, नासके हे शब्द विधानपूरक आहेत. वा शब्दांमुळेच वाक्यांना अर्थ प्राप्त झाला आहे. अनिल आहे, दूध निघाले अशी वाक्य असतील तर या वाक्यांना पूर्ण अर्थ प्राप्त होत नाही.

5. **उभयविध क्रियापद :** जे क्रियापद दोन वेगवेगळ्या वाक्यांत सकर्मक व अकर्मक या दोन्ही प्रकारे वापरता येते त्या क्रियापदास 'उभयविध क्रियापद' असे म्हणतात.

   उदा.

   1. त्याच्या गायीचे दूध काढले.
   2. प्रदीपने संगणक मोडले.
   3. ते फायबरचे संगणक मोडले.

   उदा. क्र. 1. मध्ये काढले काय? तर 'दूध' आणि काढण्याची क्रिया दुधावरच घडते म्हणून. उदा. क्र. 1 मध्ये 'काढले' हे क्रियापद अकर्मक आहे. उदाहरण क्र. 3 व 4 मध्ये 'मोडले' हे क्रियापद आहे. उदा. क्र. 3 मध्ये मोडले हे सकर्मक क्रियापद आहे. मोडणारा कोण? असा प्रश्न केल्यास प्रदीप हे उत्तर मिळते म्हणून 'प्रदीप' हा कर्ता आणि मोडण्याची क्रिया कोणावर घडते? असा प्रश्न केल्यास 'संगणक' हे उत्तर मिळते. उदा. 3 मध्ये 'प्रदीप' हा कर्ता व 'संगणक' हे कर्म आहे. म्हणून 'मोडले' हे क्रियापद 'सकर्मक' आहे. आता उदा. क्र.4 पाहा मोडणारे कोण? असा प्रश्न केल्यास संगणक हे उत्तर मिळते आणि मोडण्याची क्रिया कोणावर घडते? – तर संगणकावर म्हणून उदा. 4 मध्ये 'मोडले' हे 'अकर्मक क्रियापद' आहे. दोन वेगवेगळया वाक्यांमध्ये सकर्मक व अकर्मक अशा दोन्ही प्रकारे वापरल्या जाणाऱ्या क्रियापदास 'उभयविध क्रियापद' असे म्हणतात.

6. **संयुक्त क्रियापद :** कधी कधी वाक्याचा अर्थ पूर्ण करण्यासाठी मुख्य क्रियावाचक शब्दाला दुसऱ्या एखाद्या क्रियापदाचे साह्य घ्यावे लागते, अशा दोन शब्दांच्या मिळून बनलेल्या क्रियापदांना **संयुक्त क्रियापद** असे म्हणतात. यातील मुख्य क्रियावाचक शब्द वाक्याचा अर्थ पूर्ण करू शकत नाही, म्हणून त्याला धातुसाधित असे म्हणतात तर अर्थ पूर्ण करण्यासाठी सहाय्य

करणाऱ्या क्रियापदाला सहायक क्रियापद म्हणतात. संयुक्त क्रियापद होण्यासाठी दोन्हीही शब्दांतून एकच क्रिया दर्शवणे आवश्यक आहे. दोन्ही शब्दांतून वेगवेगळया क्रिया दर्शवल्यास ते संयुक्त क्रियापद नसते.

उदा.

1. मुले खेळू लागली. (खेळणे)
2. हा आंबा खाऊन टाक. (खाण)

7. **सिद्ध क्रियापद :** क्रियापदांमधील मूळ धातूला सिद्ध धातू असे म्हणतात. अशा धातूला प्रत्यय लागून बनलेल्या क्रियापदांना **सिद्ध क्रियापदे** असे म्हणतात.

उदा. जा–जातो, कर–करतो, बस–बसतो.

8. **साधित क्रियापद :** नाम, विशेषण, क्रियापद व अव्यय अशा विविध जातींच्या शब्दांपासून तयार होणाऱ्या धातूंना साधित धातू असे म्हणतात व अशा साधित धातूपासून बनलेल्या क्रियापदांना **'साधित क्रियापदे'** असे म्हणतात.

उदा.

1. **नामसाधित** – तो चेंडू लाथाळतो. (लाथ) – पाणावले, हाताळले, डोकावले
2. **धातुसाधित** – आम्ही ही मोटार मुंबईहून आणवली. (आणा) – मागितली, बसले
3. **विशेषण साधित** – त्या मनोहारी दृश्यावर माझे डोळे स्थिरावले. (स्थिर) – उंचावला, एकवटला
4. **अव्ययसाधित** – धर्माच्या बंधनामुळे माणसे मागासली. (मागे) – पुढारले, खालावले

9. **प्रायोजक क्रियापद :** जेव्हा एखादी क्रिया स्वतः न करता दुसऱ्याकडून करवून घेतली जाते, तेव्हा ती क्रिया दर्शविणाऱ्या क्रियापदास 'प्रायोजक क्रियापद' असे म्हणतात.

उदा.

1. ते बाळ हसते.
2. आई त्या बाळाला हसविते.

पहिल्या उदाहरणात 'हसते' हे क्रियापद आहे. दुसऱ्या उदाहरणात 'हसविते' हे क्रियापद आहे. दोन्ही क्रियापदांमधील मूळ धातू 'हस' हा आहे. वरील दोन्ही उदाहरणांत हसण्याची क्रिया बाळाकडून होते. पहिल्या उदाहरणात बाळ आपणहून हसते, तर दुसऱ्या उदाहरणात बाळाला आई हसविते. दुसऱ्या उदाहरणात हसविण्याची क्रिया आईकडून केली गेली आहे. म्हणून 'हसविते' हे क्रियापद 'प्रायोजक क्रियापद' आहे.

10. **शक्य क्रियापद :** जेव्हा क्रियापदावरून कर्त्याची शक्यता किंवा सामर्थ्य याचा बोध होतो, तेव्हा त्या क्रियापदास 'शक्य क्रियापद' असे म्हणतात.

उदा.

1. मला रोज दहा मैल चालवते.
2. मला आता थोडे बसवते.

वरील उदाहरणांमध्ये चालवते, बसवते, ही क्रियापदे असून यांमध्ये चालव, बसव, हे साधित धातू आहेत. परंतु या क्रिया करण्याची शक्यता किंवा सामर्थ्य कर्त्याला आहे. म्हणून ही 'शक्य क्रियापदे' आहेत.

11. **अनियमित किंवा गौण क्रियापद :** ज्या क्रियापदामधील धातू निश्चितपणे सांगता येत नाही, अशा क्रियापदांना **अनियमित** किंवा गौण **क्रियापदे** म्हणतात.

उदा. आहे, नाही, नव्हे, पाहिजे, नको, नलगे, नये इ.

1. मला पुस्तक पाहिजे.
2. असे वागणे बरे नाही.